# पोलीस अकादमीत अखेर स्वयंचलीत टेहळणी यंत्रणा

**अनिकेत साठे ,मंगळवार, २२ फेब्रुवारी २०११**



लष्कर ए तय्यबाच्या हस्तकांनी गतवर्षी केलेल्या रेकीच्या पाश्र्वभूमीवर, महाराष्ट्र पोलीस अकादमीच्या सुरक्षिततेविषयी उपस्थित झालेल्या वेगवेगळ्या प्रश्नचिन्हांवर अखेर तोडगा काढण्यात यश आले असून अकादमीच्या संपूर्ण म्हणजे जवळपास २५० एकरच्या परिसरात चौफेर नजर ठेवून संशयास्पद हालचाली टिपू शकेल, अशा क्षमतेची अत्याधुनिक स्वयंचलीत टेहेळणी यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. या यंत्रणेची एकूणच क्षमता विलक्षण आहे. वीज पुरवठा खंडित करून दहशतवाद्यांनी अकादमीत शिरण्याचा प्रयत्न केला तरी ही यंत्रणा अथकपणे कार्यान्वित राहून हल्ल्याची पूर्वसूचना देण्याची कामगिरी निभावू शकते. तसेच यंत्रणेत दहशतवाद्यांबाबतची माहिती समाविष्ट केल्यानंतर संबंधिताने वेश पालटून घुसखोरीचा प्रयत्न केला तरी तो तिच्या नजरेतून सुटणार नाही. एवढेच नव्हे तर, अकादमीत प्रवेश करणाऱ्या प्रत्येक वाहनाचा क्रमांक नोंदविण्याचे कामही ती करणार आहे, हे विशेष !

इस्त्रायल, अमेरिका व नॉर्वे अशा तीन वेगवेगळ्या देशांकडून मागविलेल्या यंत्रणांच्या माध्यमातून ही टेहेळणी यंत्रणा विकसित केली गेली आहे. रेव्हमॅक्स सिक्युरिटी सिस्टीम व क्रेडल टेक्नॉलॉजीस् या कंपन्यांनी तिचा दर्जा सध्या जगात वापरल्या जाणाऱ्या अत्युच्च दर्जाच्या टेहळणी यंत्रणांच्या समकक्ष किंबहुना त्याहून सरस राहील याची दक्षता घेतली आहे. लष्कर ए तय्यबाचा दहशतवादी शेख लालबाबा मोहंमद हुसेन उर्फ बिलाल याने गेल्या वर्षी महाराष्ट्र पोलीस अकादमीस, लष्कराच्या देवळाली तोफखाना स्कुलसह अन्य काही ठिकाणांची रेकी केल्याचे उघड झाले होते. या ठिकाणांचे छायाचित्रण व नकाशे त्याच्याकडे सापडल्याने पाकिस्तानात दहशतवाद्यांनी जसे पोलीस प्रशिक्षण केंद्रावर हल्ले चढवून सुरक्षा दलांचे मनौधैर्य खच्चीकरण करण्याची पद्धत अवलंबिली, तसाच प्रकार भारतात देखील करण्याचे त्यांचे मनसुबे असल्याचे दहशतवाद विरोधी पथकाने स्पष्ट केले होते. बिलालला जेरबंद केले गेले असले तरी तत्पूर्वी त्याने देशातील महत्त्वपूर्ण माहिती सांकेतिक भाषेत पाकिस्तानात पाठविली होती. या घटनाक्रमांमुळे पोलीस अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणाऱ्या महाराष्ट्र पोलीस अकादमीच्या सुरक्षिततेच्या मुद्याकडे सर्वाचे लक्ष वेधले गेले. त्या अनुषंगाने अकादमी व येथे प्रशिक्षण घेणाऱ्या हजारो पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून ही टेहेळणी यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.

शहराच्या मध्यवस्तीत असणाऱ्या पोलीस अकादमीच्या २५० एकरच्या विस्तीर्ण परिसरात प्रत्येक ठिकाणी घुसखोरीवर लक्ष देणे अवघड आहे. ही बाब लक्षात घेऊन अकादमीच्या संपूर्ण परिसरात स्वयंचलीत पद्धतीने काटेकोरपणे नजर ठेवण्याचे काम ही यंत्रणा करणार आहे. राज्याचे पोलीस महासंचालक डी. शिवानंदन, पोलीस अकादमीचे संचालक संजय बर्वे, उपसंचालक डॉ. निखील गुप्ता, रेव्हमॅक्स कंपनीचे कौस्तुभ बुटाला व क्रेडलचे शाम जावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत यंत्रणेचे उद्घाटन करण्यात आले. यंत्रणेसाठी खास नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आली असून येथून संपूर्ण अकादमीत काय घडत आहे यावर नजर ठेवता येणार आहे. अकादमीचे प्रवेशद्वार वगळता अन्य कोणत्याही मार्गाने घुसखोरीचा प्रयत्न झाला तर लगेचच ‘अलार्म’द्वारे यंत्रणा त्याची माहिती देईल. रात्री व दिवसा उत्कृष्ट दर्जाचे छायाचित्रण करू शकतील अशा कॅमेऱ्यांचा यंत्रणेत वापर करण्यात आला आहे. अकादमीच्या कोणत्या भागात घुसखोरी होत आहे, ते समजण्यासाठी परिसराच्या संगणकीय नकाशाची निर्मिती करण्यात आली आहे. घुसखोरीची पूर्वसूचना मिळाल्यानंतर सुरक्षा व्यवस्था सतर्क होवून हल्ला परतावून लावण्यासाठी सज्ज होवू शकते, या बाबतची माहिती कौस्तुभ बुटाला यांनी दिली. टेहेळणीसाठी वापरण्यात आलेले कॅमेरे कोणत्याही हवामानात प्रभावीपणे काम करू शकतात. कॅमेरे बसविण्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण डिझाईनच्या खांबांचा वापर करण्यात आला आहे. मुंबईत कॅमेरे बसविण्यासाठी योग्य डिझाईन्सचे खांब न मिळाल्याने काही अडचणींचा सामना करावा लागल्याचा अनुभव आहे. यामुळे या खांबांची निर्मिती जागतिक मानके लक्षात घेऊन करण्यात आली आहे. एखाद्या ट्रकची धडक सहजपणे पचवू शकतील. जमिनीवर हादरे बसत असताना अथवा आकाशात विजा चमकत असतानाही त्याची कार्यक्षमता टिकून राहील. या आधुनिक यंत्रणेद्वारे अकादमीची सुरक्षा व्यवस्था ‘टेक्नोसॅव्ही’ झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

* २५० एकर परिसराची काटेकोर टेहेळणी
* वेष पालटून घुसखोरीचा प्रयत्न निष्फळ ठरवण्याची क्षमता
* वीज पुरवठा खंडित झाला तरी कार्यान्वित राहणार
* अकादमीत ये-जा करणाऱ्या प्रत्येक वाहनाची नोंद
* कोणत्याही हवामानात कार्यान्वित राहणारे कॅमेरे